| | | | |
|---|---|---|---|
| MHNG170008402024 | खटला दाखल तारीख | :– | २४.१२.२०२४ |
| | खटला नोंदणी तारीख | :– | २४.१२.२०२४ |
| | निकालाची तारीख | :– | ०४.०५.२०२६ |
| | कालावधी | :– | वर्ष : महिने : दिवस<br>०१ ०४ ११ |

**विद्यमान न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, भिवापूर, तह. भिवापूर, जिल्हा –नागपूर**
**(पिठासीन अधिकारी श्री. एस.जे. लाड)**

**नियमित फौजदारी खटला क्र.१३२/२०२४** **निशाणी क्र.२९.**

**प्रथम खबर मधील तपशिल :–**

अपराध क्रमांक : ३९३/२०२४, दिनांक ०३.०९.२०२४

पोलीस स्टेशन : भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर.

| | |
|---|---|
| अभियोग पक्ष – | महाराष्ट्र सरकारतर्फे पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर |
| अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ | श्री एस.एस.मोरे |
| **आरोपी –** | **कृष्णा गुलाब मेश्राम,**<br>वय –३५ वर्षे, व्यवसाय – -,<br>रा. मौजा धामणगाव वि., तालुका- भिवापूर,<br>जि.नागपूर. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ – | श्री. पी.एल.नागोशे |

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | ०३.०९.२०२४ |
| गुन्हा दाखल तारीख | ०३.०९.२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | २४.१२.२०२४ |
| दोषारोप निश्चीत केल्याची तारीख | २१.०२.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २०.०६.२०२५ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयाकरिता राखीव ठेवलेली तारीख | ०४.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०४.०५.२०२६ |
| शिक्षेची तारीख, जर दिली असेल तर | ---- |

## आरोपीचे विवरण

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप | शिक्षा अथवा निर्दोष मुक्त | शिक्षेबाबत विवरण | उपभोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कृष्णा गुलाब मेश्राम | सूचना पत्रावर सोडले | २१.०२. २०२५ | कलम ११८ (१) भारतीय न्याय संहिता, २०२३ | निर्दोष मुक्त केले. | – | – |

## तपासलेले साक्षीदार

अ. अभियोग पक्षातर्फे :–

| अ.क्र. | साक्षीदारांचे नाव | पुराव्यातील स्थान | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| सा.क्र.१ | गणेश हिरामन रंगारी | फिर्यादी | ११ |
| सा.क्र.२ | अमित विश्वपाल खोब्रागडे | घटनास्थळ पंच | १४ |
| सा.क्र.३ | शुभम तुलाराम रंगारी | घटनास्थळ पंच | १७ |
| सा.क्र.४ | सागर ज्ञानेश्वर श्रीरामे | जप्ती पंच | १८ |
| सा.क्र.५ | आनंद रामभाऊ धात्रक | तपास अधिकारी | १८–अ |
| सा.क्र.६ | विपलव नरेश कांबळे | वैद्यकीय अधिकारी | २२ |

ब. बचाव पक्षातर्फे :–

| अ.क्र. | साक्षीदारांचे नाव | पुराव्यातील स्थान | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| सा.क्र.१ | मानीक धोंडबाजी चौधरी | साक्षीदार | २६ |
| सा.क्र.२ | प्रमोद दादाजी गणवीर | साक्षीदार | १७ |

क. न्यायालयातर्फे :– नाही.

## निशाणी क्रमांकाची यादी

अ. अभियोग पक्षातर्फे :–

| अ.क्र. | निशाणी | पुराव्याचे स्थान |
|---|---|---|
| १. | फिर्याद | नि.क्र.१२ |
| २. | छापिल प्रथम खबर अहवाल | नि.क्र.१३ |
| ३. | समन्स | नि.क्र.१५ |
| ४. | घटनास्थळ पंचनामा | नि.क्र.१६ |
| ५. | जप्ती पंचनामा | नि.क्र.१९ |
| ६. | क्युरी पत्र | नि.क्र.२० |
| ७. | मुद्देमाल पावती | नि.क्र.२१ |
| ८. | वैद्यकीय प्रमाणपत्र | नि.क्र.२३ |
| ९. | क्युरी अहवाल | नि.क्र.२४ |
| १०. | जप्त दगड | आर्टिकल अ |

ब. बचाव पक्षातर्फे :– नाही.

क. न्यायालयातर्फे :– नाही.

### ड. मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | जी.पी.क्र.४/२०२५ | ओबड धोबड लहान दगड |

## न्या य नि र्ण य

### (दिनांक ४ मे, २०२६ रोजी पारीत)

सदरचा खटला हा आरोपीविरुध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१) (यापुढे संक्षिप्तमध्ये ''भा.न्या.सं. असे संबोधण्यात येईल'') अंतर्गत चालविण्यात आलेला आहे.

**अभियोग पक्षाची संक्षिप्त हकीकत :–**

२. दि.०३.०९.२०२४ रोजी दुपारी ३.३० वा. फिर्यादी गणेश हिरामन रंगारी हा त्याचा मित्र अमीत खोब्रागडे याच्यासोबत त्याच्या बाईकवर घराकडे येत होता. तेव्हा फिर्यादी त्याच्या मित्र अमीत याला गमती मजाकमध्ये शिव्या दिल्या. तेव्हा तेथे कृष्णा मेश्राम याने 'तु मला का शिवीगाळ करीत आहे' असे म्हणून जमिनीवरचे लहान दगड उचलून फिर्यादीच्या डोक्याला मारले. तसेच, हातबुक्याने त्याच्या छातीवर मारले. त्यामुळे त्याला डोक्याला जखम होवून रक्त निघाले. फिर्यादीला कृष्णा मेश्राम पासून धोका निर्माण झाल्याने त्याने पोलीस स्टेशनला जाऊन फिर्याद दिली.

३. फिर्यादीच्या उपरोक्त आशयाच्या फिर्यादीवरुन आरोपीविरुध्द अपराध क्रमांक ३९३/२०२४ भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१) पोलीस स्टेशन, भिवापूर येथे गुन्ह्याची नोंद केली. पोलीस हवालदार आनंद रामभाऊ धात्रक यांच्याकडे तपास आला. त्यांनी तपासादरम्यान जप्ती पंचनामा केला, जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्राबाबत क्युरीकरिता पत्र दिले, जप्त केलेला दगड मोहररकडे जमा करु तशी मुद्देमाल पावती फाडली, साक्षीदारांचे बयान नोंदविले व तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

४. मी आरोपीविरुध्द निशाणी क्र.१० वर भा.न्या.सं. चे कलम ११८(१) अन्वये दोषारोप निश्चित केला व आरोपीला त्याच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगितला. त्यावरुन आरोपीची जबानी नि.क्र.११ वर नोंदविण्यात आली. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे सांगून संपरिक्षा चालविण्याची विनंती केली. साक्षीदारांच्या पुराव्यात आरोपीविरुध्द सबळ पुरावा आल्यामुळे आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ३५१ अंतर्गतचे बयान नि.क्र.२५ वर नोंदविण्यात आले. त्यात आरोपीने साक्षीदार तपासायचे असल्याचे कथन केले. तसेच, खोटी केस केल्याचा बचाव घेतला.

५. खालील मुद्दे निर्धारणाकरीता उपस्थित होतात, त्यांना मी सहकारण निष्कर्ष देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे सिद्ध केले आहे काय की, दि.०३.०९.२०२४ रोजी दु.३.३० वा. मौजा धामणगाव विद्यामंदिर, ता.भिवापूर येथे फिर्यादी गणेश हिरामन रंगारी याला दगडाने मारहाण करुन साधी दुःखापत केली आणि त्यायोगे भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१) अन्वये गुन्हा केला काय? | **नाही.** |
| २. | आदेश काय ? | **...अंतिम आदेशानुसार.** |

## का र ण मि मां सा

६. अभियोग पक्षाने आरोपीवरील गुन्हा सिद्ध करण्यासाठी एकूण सहा साक्षीदार तपासले. तसेच आरोपीने त्याचा बचाव सिद्ध करण्यासाठी एकूण दोन साक्षीदार तपासले. अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे व आरोपी तर्फे वकील श्री पी.एल.नागोशे यांचा तोंडी युक्तीवाद ऐकला.

**मुद्दे क्रमांक १ करिता** :–

७. अभियोग पक्षाने घटना सिद्धतेकामी सर्वप्रथम फिर्यादी गणेश हिरामन रंगारी (सा.क्र.१) याला नि.क्र.११ वर तपासले. त्याने त्याच्या पुराव्यात असे कथन केले की, घटना दि.०३.०९.२०२६ रोजी दुपारी ३.०० ते ४.०० वा. दरम्यान धामणगाव विद्यामंदिर येथे त्याच्या घराच्या बाजुला घडली. त्यावेळी तो व त्याचा मित्र अमित खोब्रागडे त्याच्या दुचाकीने निघाले असता त्याच्यासमोर अमितने दुचाकी चालवत असताना अचानक क्लच सोडला त्यामुळे त्याची गाडी वर उचकली त्यामुळे त्याने अमितला शिवीगाळ केली. त्यावेळी कृष्णा मेश्राम त्याच्या घरी असताना त्याला असे

वाटले की, 'मी त्याला शिवीगाळ करीत आहे'. कृष्णा मेश्राम त्याच्या घराच्या बाजुला राहतो. त्याच्या दुचाकीवर त्यावेळी ते तीनजन होते. त्यावेळी कृष्णा तिथे आला व त्याने त्याची कॉलर पकडली, गाडीवरुन खाली पाडले व दगडाने मारले. त्यामुळे त्याच्या डोक्यातून रक्त येवू लागले. त्याच्या बरोबर असलेल्या दोघांनी कृष्णाला पकडून बाजूला केले. तरी ही तो त्याला मारण्यासाठी वारंवार येत होता. त्यामुळे लोकांनी त्याला बाजूला केले व फिर्याद देण्याकरिता तो भिवापूरला आला. सदर साक्षीदाराच्या पुराव्यात फिर्याद नि.क्र.१२, छापील प्रथम खबर अहवाल नि.क्र.१३ व जप्त केलेला दगड आर्टिकल अ वर सिद्ध करण्यात आले. तसेच तो आरोपीला ओळखतो. पोलिसांनी त्याला उपचाराकरिता ग्रामीण रुग्णालय भिवापूर येथे पाठविले होते. तसेच पोलिसांनी त्याचा बयान घेतला होता.

८. बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासात त्याने असे मान्य केले की, तथाकथीत फिर्याद देण्यापूर्वीपासून आरोपी व त्याचे एकमेकाकडे येणे जाणे व बोलणे चालणे बंद आहे. तो आरोपीच्या घरासमोर राहतो. तो अविवाहीत आहे. आरोपीला दोन मुली व एक मुलगा आहे. त्याने पुढे असे मान्य केले की, आरोपीच्या पत्नीचे नाव मनिषा आहे. तसेच, फिर्यादीला असे विचारण्यात आले की, त्याचे व आरोपीचे प्रेम संबंध आहे काय ज्याला त्याने नाकारले. तसेच, त्याला असेही विचारण्यात आले की, आरोपीची पत्नी व तो पळून गेले होते व त्यांचे तंटामुक्ती समोर प्रकरण ठेवण्यात आले त्यावेळी त्याने आरोपीच्या पत्नीला नांदवेल असे म्हटले ही बाबही त्याने स्पष्टपणे नाकारली. तसेच, आर्टिकल अ वरील दगड संपूर्ण मुट्ठीमध्ये बसतो. साक्षीदार पुन्हा सांगते की, त्याच दगडाने त्याला मारहाण केली. त्याला मारहाण झाल्यामुळे रक्ताने कपडे भरले होते व जमिनीवर सांडले होते. त्याने पोलिसांना त्याचे रक्ताने भरलेले कपडे फिर्याद देताना दिले नव्हते. त्याने पुढे असे मान्य केले की, आर्टिकल अ सारखे दगड गावामध्ये बऱ्याच ठिकाणी असतात. इतर सर्व उत्तरसूचक प्रश्नांना त्याने नकारार्थी उत्तर दिले.

९. त्यानंतर अभियोग पक्षाने घटनास्थळ पंच अमीत विश्वपाल खोब्रागडे (सा.क्र.२) याला नि.क्र.१४ वर तपासले. त्याने त्याच्या पुराव्यात असे कथन केले की, तो आरोपीला ओळखतो. घटना दि.०३.०९.२०२४ रोजी दुपारी ३.०० ते ३.३० वा. दरम्यान धामणगाव विद्यामंदिर येथील विहाराजवळ घडली होती. त्यावेळी तो गणेश याची दुचाकी चालवत होता त्यावेळी त्याच्याकडून गाडीचा क्लच अचानक सुटला त्यामुळे गाडी उचकली. तेव्हा गणेशने त्याला शिवीगाळ केली. त्यावेळी कृष्णा हा तिथे आला व त्याने गणेश याला मारहाण केली. त्यानंतर पोलिसांनी त्याला पंचनाम्याकरिता बोलाविले होते. सदर साक्षीदाराच्या पुराव्यात समन्स नि.क्र.१५ व घटनास्थळ पंचनामा नि.क्र.१६ वर सिद्ध केले. पोलिसांनी त्याचे बयान घेतले होते. बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासात त्याने असे मान्य केले की, धामणगाव लहाण गाव आहे. त्यामुळे गावात कुठलीही घटना घडल्यास त्याची माहिती होवून जाते. आरोपी त्याचा मामाचा मुलगा आहे. आरोपीच्या पत्नीचे नाव मनिषा आहे. तसेच, पोलिसांनी त्याच्याकडे विचारपूस केली तेव्हा सही घेतली. पोलिसांनी एकाचवेळी त्याची सही घेतली होती. इतर सर्व उत्तरसूचक प्रश्नांना त्याने नकारार्थी उत्तर दिले.

१०. त्यानंतर अभियोग पक्षाने जप्ती पंच शुभम तुलाराम रंगारी (सा.क्र.३) याला नि.क्र.१७ वर तपासले. त्याने अभियोग पक्षास सहकार्य केले नसल्यामुळे अभियोग पक्षाने त्याला फितूर घोषित केले व त्याचा सविस्तर उलट तपास घेतला, परंतु, त्यामध्ये देखील त्याने अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष अभियोग पक्षाच्या कुठल्याही उपयोगाची नाही. त्यानंतर अभियोग पक्षाने जप्ती पंच सारंग ज्ञानेश्वर श्रीरामे (सा.क्र.४) याला नि.क्र.१८ वर तपासले. त्याने अभियोग पक्षास सहकार्य केले नसल्यामुळे अभियोग पक्षाने त्याला फितूर घोषित केले व त्याचा सविस्तर उलट तपास घेतला. उलट तपासात त्याने असे मान्य केले की, दि.०३.०९.२०२५ रोजी

पोलिसांनी त्याला मौजा धामणगाव, ता.भिवापूर येथे पंचनाम्याकरिता बोलाविले होते. तसेच पोलिसांनी त्याच्या समक्ष घटनास्थळावरुन एक ओबडधोबड दगड जप्त केला. बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासात असे मान्य की, तो कोर्टात फिर्यादीच्या गाडीवर बसून आला व फिर्यादीसोबत बोल चाल झाली. तसेच त्याने असे मान्य केले की, कोर्टात काय सांगायचे आहे फिर्यादीने सांगितले होते म्हणून तो आज सांगत आहे व फिर्यादीचे आरोपीच्या पत्नीसोबत भांडण होते. त्याने पुढे असे मान्य केले की, आर्टिकल अ सारखे दगड गावात असतात व पोलिसांनी त्याच्या समक्ष दगड जप्त केला होता.

**११.** त्यानंतर अभियोग पक्षाने तपास अधिकारी आनंद रामभाऊ धात्रक (सा.क्र.५) यांना तपासले. त्यांच्या पुराव्यात असे आले की, दि.०३.०९.२०२४ रोजी ते पोलीस स्टेशन भिवापूर येथे पोलीस हवालदार म्हणून कार्यरत असताना गुन्हा क्र.३९४/२०२४ नोंद झाल. प्राथमिक तपास माहुरे यांनी केला व पुढील तपास त्यांच्याकडे आला. तपासादरम्यान त्यांनी गुन्ह्यात वापरलेला दगड फिर्यादीने दाखविल्याप्रमाणे घटनास्थळा पंचासमक्ष जप्त केला व तसा जप्ती पंचनामा तयार केला. त्यानंतर जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्रासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे क्युरीकरिता पत्र दिले होते. त्यानंतर जप्त केलेल्या मुद्देमालाची पावती फाडली व साक्षीदारांचे बयान नोंदविले. सदर साक्षीदाराच्या पुराव्यात जप्ती पंचनामा नि.क्र.१९, क्युरीकरिता दिलेले पत्र नि.क्र.२०, मुद्देमाल पावती नि.क्र.२१ व जप्त केलेले दगड आर्टिकल अ वर सिद्ध करण्यात आले. तपासाअंती दोषारोप पत्र दाखल केले. बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासात त्यांनी असे मान्य केले की, तपासादरम्यान असे निष्पण झाले होते की, आरोपी व फिर्यादीमध्ये घटनेपूर्वीपासून बोलचाल बंद आहे. इतर सर्व उत्तरसूचक प्रश्नांना तिने नकारार्थी उत्तर दिले.

**१२.** त्यानंतर अभियोग पक्षाने वैद्यकीय अधिकारी विपलव नरेश कांबळे

(सा.क्र.६) यांना नि.क्र.२२ वर तपासले. त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, दि.०३.०९.२०२४ रोजी त्या ग्रामीण रुग्णालय भिवापूर येथे कार्यरत असताना सायं.५.०० वा. पो.ह. सतीश ब.क्र.४०४ यांनी गणेश रंगारी याला वैद्यकीय तपासणीकरिता आणले होते. त्याने मारहाण झाल्याबाबत सांगितले. त्याची वैद्यकीय तपासणी केली असता त्याला खालीलप्रमाणे जखमा आढळून आल्या.

i] Contusion lacerated wound over scalp – 1cm x 2 cm.

**१३.** त्यानंतर त्यांनी पुराव्यात पुढे असे कथन केले की, दि.२६.०९.२०२४ रोजी पोलिसांनी त्याला जप्त केलेल्या संदर्भात क्युरीकरिता पत्र दिले होते. त्यानंतर त्यांनी तो दगड तपासून तसा क्युरी अहवाल दाखल केला. सदर साक्षीदाराच्या पुराव्यात जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र नि.क्र.२३ वर व क्युरी अहवाल नि.क्र.२४ वर सिद्ध करण्यात आले. बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासात त्यांनी असे मान्य केले की, ते एखाद्या जखमी व्यक्तीने मारहाण बाबत सांगितल्यास ते तसे लिहून घेतात. त्यांनी पुढे असे मान्य केले की, जर जखमी व्यक्तीने सांगितले की, कोणत्या हत्याराने त्यांना मारहाण झाली आहे तर ते ही ते लिहून घेतात. त्यांनी पुढे असे मान्य केले की, नि.क्र.२३ मधील जखमा या एखादी व्यक्ती ओबड धोबड रस्त्यावर पडल्यास होऊ शकतात. त्यांनी पुढे असे मान्य केले की, एखादी व्यक्ती दगडावर पडल्यास नि.क्र.२३ वरील नमूद जखम होऊ शकते. इतर सर्व उत्तर सुचक प्रश्नांना तिने नकारार्थी उत्तर दिले.

**१४.** त्यानंतर आरोपीने आपला बचाव सिद्ध करणेकरिता साक्षीदार मानिक धोंडबाजी चौधरी (यापुढे संक्षिप्तमध्ये ब.सा.क्र. असे संबोधण्यात येईल) (ब.सा.क्र.१) याला नि.क्र.२६ वर तपासले. त्याने त्याच्या पुराव्यात असे कथन केले की, तो आरोपी, त्याची पत्नी व फिर्यादीला ओळखतो. ते लोक त्याच्या गावचे आहेत व तो गावातील तंटामुक्ती समितीचा अध्यक्ष आहे म्हणून ओळखतो. तो सन–२००८ पासून तंटामुक्तीचा अध्यक्ष आहे. सन २०२२–२३ मध्ये तंटामुक्ती समितीची आरोपी, त्याची पत्नी व

फिर्यादीच्या वादासंबंधात बैठक घेतली होती. त्या बैठकीला पोलीस पाटील प्रमोद गणवीर ते व इतर गावातील लोक उपस्थितीत होते. त्यावेळी आरोपीच्या पत्नीचे असे म्हणणे होते की, 'ती फिर्यादीसोबत लग्न करु इच्छीते' त्यावेळी फिर्यादीही तिच्यासोबत लग्न करायला तयार होता. त्यावेळी आरोपी म्हणाला की, 'त्याच्या पत्नीला लग्न करायचे असल्यास तिने मुलांनाही न्यावे'. त्यावेळी गणेश रंगारी हा मुलांना घेवून जाण्यास तयार नव्हता. त्यावेळी बैठकीमध्ये गणेश रंगारी मुलं घेवून न जाण्याचा कारणावरुन लग्नास तयार झाला नाही. त्यावेळी ती बैठक तिथे संपली होती. अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासात त्याने सर्व उत्तरसूचक प्रश्नांना नकारार्थी उत्तर दिले.

**१५.** त्यानंतर बचाव पक्षाने दुसरा साक्षीदार प्रमोद दाजीबा गणवीर (ब.सा.क्र.२) याला नि.क्र.२७ वर तपासले. त्याने त्याच्या पुराव्यात असे कथन केले की, तो आरोपी, त्याची पत्नी व फिर्यादीला ओळखतो. ते लोक त्याच्या गावचे आहेत. घटना दोन वर्षांपूर्वीची आहे. त्यावेळी आरोपीची पत्नी व फिर्यादी गणेश रंगारी यांचे प्रेमसंबंध होते. त्यावेळी गणेश रंगारी असे म्हणत होता की, त्याचे आरोपीच्या पत्नीशी प्रेमसंबंध असल्यामुळे तो तिला ठेवायला तयार आहे. त्यावेळी तंटामुक्ती समितीची बैठक घेतली होती. त्या बैठकीला तो, तंटामुक्ती अध्यक्ष माणीकराव चौधरी व इतर गावातील लोक उपस्थिती होते. त्यावेळी गणेश रंगारी याचे म्हणणे होते की, 'मी आरोपीच्या पत्नीसोबत लग्न करेन पण पोरं ठेवणार नाही' त्यावेळी आरोपी म्हणाला की, 'त्याच्या पत्नीला लग्न करायचे असल्यास तिने मुलांनाही न्यावे'. त्यावेही गणेश रंगारी हा मुलांना घेवून जाण्यास तयार नव्हता. त्यावेळी त्यामध्ये समझोता झाला. अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासात त्याने असे मान्य केले की, तो पोलीस पाटील आहे व गावात एखादी गुन्हा घडल्यास त्याकरिता पोलिसांना खबर देतो व मदत करतो. त्याने घटनेच्यावेळी पोलीस चौकशी करायला आले तेव्हा त्यांना समझोताबाबत सांगितले नाही कारण तो घटनेपूर्वीच झालेला होता. इतर सर्व उत्तरसूचक प्रश्नांना नकारार्थी उत्तर दिले.

**१६.** अभियोग पक्षाच्या संपुर्ण पुराव्याचे अवलोकन करिता असे निदर्शनास येते की, सर्वप्रथम वैद्यकीय अधिकारी विपलव नरेश कांबळे (सा.क्र.६) यांच्या पुराव्याचे अवलोकन करिता असे निदर्शनास येते की, घटनेच्या दिवशी फिर्यादी गणेश हिरामन रंगारी (सा.क्र.१) याला जखम झाली होती. तसेच, त्यांनी दाखल केलेल्या क्युरी अहवालानुसार ती जखम जप्त केलेल्या दगडाने होऊ शकते असे कथन केले. त्यामुळे वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पुराव्यावरुन हे सिद्ध होते की, घटनेच्या दिवशी फिर्यादीला नि.क्र.२३ प्रमाणे जखम झाली होती. आता अभियोग पक्षाच्या पुराव्यात हे पाहणे महत्वाचे आहे की, ती जखम ही आरोपीने मारहाण केल्यामुळे झाली होती का ?

**१७.** त्या अनुषंगाने घटना सिद्ध करणेकरिता अभियोग पक्षाने एकूण दोन प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासले. फिर्यादी गणेश हिरामन रंगारी (सा.क्र.१) व अमीत विश्वपाल खोब्रागडे (सा.क्र.२) याला तपासले. सर्वप्रथम फिर्यादीच्या पुराव्याचे अवलोकनकरिता त्याने फिर्याद नि.क्र.१२ मधे नमूद केल्याप्रमाणे साक्ष दिली. घटनेच्यावेळी तो व त्याचा मित्र दुचाकीने जात असताना अमीतने अचानक क्लच सोडला त्यामुळे त्याने त्याला शिवीगाळ केली तेव्हा आरोपीला असे वाटले की, तो आरोपीला शिवीगाळ करीत आहे. तेव्हा आरोपीने येवून फिर्यादीची कॉलर पकडले व त्याला गाडीवरुन खाली पाडले व त्याला दगडाने मारले. त्यामुळे त्याच्या डोक्यातून रक्त येवू लागले. सदर साक्षीदाराने जप्त केलेला दगड आर्टिकल अ वर ओळखला. बचाव पक्षातर्फे वकील श्री. नागोशे यांनी असा युक्तीवाद केला की, फिर्यादी गणेश हिरामन रंगारी (सा.क्र.१) याचे आरोपीच्या पत्नीसोबत अनैतिक संबंध होते व तो तिला घेवून पळून गेला होता. त्यानंतर गावाच्या तंटामुक्ती समितीसमोर तिला व फिर्यादीला बोलाविण्यात आल्यानंतर फिर्यादी त्याच्या पत्नीला सोबत ठेवण्यास तयार झाला होता. त्यावेळी फिर्यादी हा आरोपीचे मुलं ठेवण्यास तयार नव्हता त्या वेळेपासून आरोपीसोबत त्याचे

संबंध खराब आहे. सदर युक्तीवादाच्या अनुषंगाने फिर्यादीला उलट तपासात अनैतिक संबंधा संबंधात सर्व उत्तरसूचक प्रश्नांना त्याने नकारार्थी उत्तर दिले.

**१८.** त्या अनुषंगाने दुसरा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अमीत विश्वपाल खोब्रागडे (सा.क्र.२) याच्या पुराव्याचे अवलोकनकरिता त्याने फिर्यादी सांगत असल्याप्रमाणे घटना सांगितली. त्याने असे कथन केले की, आरोपीने फिर्यादीला मारहाण केली होती, परंतु, त्याने असे कुठेही कथन केले नाही की, फिर्यादीला कोणत्या हत्याराने आरोपीने मारहाण केली. सदर साक्षीदाराला तपास अधिकाऱ्यांनी पंचनामा साक्षीदार म्हणून देखील तपासले. त्याच्या पुराव्यात घटनास्थळ पंचनामा नि.क्र.१६ वर सिद्ध करण्यात आला. माझ्या मते, घटना ही गावातील सार्वजनिक ठिकाणी घडली. अमीत विश्वपाल खोब्रागडे (सा.क्र.२) हा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असल्यामुळे तपास अधिकारी आनंद रामभाऊ धात्रक (सा.क्र.५) यांनी पंच साक्षीदार म्हणून दुसरा साक्षीदार घेणे गरजेचे होते. तसेच, त्यांनी अमीत विश्वपाल खोब्रागडे (सा.क्र.२) यालाच का पंच साक्षीदार म्हणून केले हे पुराव्यात सांगितले नाही. सदर साक्षीदार हा फिर्यादीचा मित्र आहे व तो घटनेच्यावेळी हजर होता. त्यामुळे पंचनामा सिद्ध करणेकामी त्याचा पुरावा उपयोगाचा नाही.

**१९.** त्यानंतर अभियोग पक्षाने जप्ती पंच म्हणून शुभम याला तपासले, परंतु, त्याने अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. तसेच, जप्ती पंचमधील दुसरा साक्षीदार शुभम तुलाराम रंगारी (सा.क्र.३) याने जरी जप्ती पंचनाम्यातील मजकूर नाकारला तसेच पंचनाम्यावर सही नाही असे सांगितले, परंतु, त्याने जप्त केलेला दगड ओळखला. अभियोग पक्षाने त्याला फितूर घोषित करुन त्याचा सविस्त उलट तपास घेतला. त्यामधे त्याने त्याच्या समक्ष दगड जप्त केल्याचे कथन केले, परंतु, माझ्या मते, सदर साक्षीदाराने जप्ती पंचनाम्यावरील त्याची सही नाकारली. त्यामुळे त्याच्या समक्षच दगड जप्त करण्यात

आला याबाबत संशय निर्माण होतो व दुसरा जप्ती पंच साक्षीदाराने सहकार्य न केल्याने त्याबाबत संशय निर्माण होतो. अभियोग पक्षाने जप्ती पंचनामा तपास अधिकारी आनंद रामभाऊ धात्रक (सा.क्र.५) यांच्या पुराव्यात नि.क्र.१९ वर सिद्ध केले. जप्ती पंचनामा नि.क्र.१९ चे काळजीपूर्वक अवलोकनकरिता त्यामधे मौजा धामणगाव विद्यामंदिर येथून दगड जप्त केल्याचे नमूद आहे. जप्ती पंचनामा नि.क्र.१९ मधे नेमक्या कोणत्या घटनास्थळावरुन दगड जप्त करण्यात आला हे स्पष्टपणे नमूद नाही. तसेच तो दगड कोणत्यावेळी जप्त करण्यात आला ती वेळ देखील नमूद केलेली नाही. तपास अधिकाऱ्यांनी पंचनाम्यामधे संपूर्ण गावाचा पत्ता लिहून दगड जप्त केला असे नि.क्र.१९ वरुन दिसून येते. त्यामुळे तपासामधील ही महत्वाची तृटी खटल्याच्या मुळाशी जाते. तसेच पंच साक्षीदारांनी सहकार्य न केल्यामुळे पुर्ण जप्ती प्रक्रियेवरच संशय निर्माण होतो. सर्वात महत्वाचे म्हणजे नि.क्र.१९ वर फिर्यादीची सही घेण्यात आली. त्यामुळे फिर्यादीनेच दाखविल्याप्रमाणे दगड जप्त केला असे दिसून येते. त्यामुळे खटल्यामधे वाजवी संशय निर्माण होतो.

२०. बचाव पक्षातर्फे दोन साक्षीदार तपासण्यात आले मानिक धोंडबाजी चौधरी (ब.सा.क्र.१) व साक्षीदार प्रमोद दाजीबा गणवीर (ब.सा.क्र.२). त्यांच्या पुराव्यात असे आले की, आरोपीची पत्नी व फिर्यादी व आरोपी संदर्भात तंटामुक्तीची बैठक झाली होती. त्यामधे आरोपीची पत्नी फिर्यादीसोबत लग्न करायला तयार होती. त्यावेळी आरोपी फिर्यादीला म्हणाला की, त्याच्या पत्नीसोबत लग्न करायचे असल्यास मुलांना न्यावे त्यावेळी फिर्यादी मुलांना नेन्यास तयार नव्हता. त्यावरुन वाद झाला. अभियोग पक्षाने दोन्ही साक्षीदारांचा उलट तपास घेतला, परंतु, त्याचा पुरावा नाकारला जाईल असे काहीही आले नाही. बचाव पक्षातर्फे गावातील पोलीस पाटील प्रमोद गणवीर (ब.सा.क्र.२) यांचा पुरावा नोंदविण्यात आला. त्यांच्या पुराव्यात आरोपीची पत्नी व

फिर्यादीचे प्रेम संबंध होते व त्यामुळे तो त्यांना ठेवण्यास तयार होता, परंतु, आरोपीच्या मुलांना ठेवण्यास तयार नव्हता. वरील बचाव पक्षाच्या साक्षीदारांच्या पुराव्यावरुन आरोपीची पत्नी व फिर्यादीमधे प्रेम संबंध होते व त्या संदर्भात तंटामुक्तीची बैठक झाली होती हे स्पष्टपणे दिसून येते.

२१. त्यामुळे आरोपीचा असा बचाव आहे की, फिर्यादीने आरोपीच्या पत्नीसोबत असलेल्या अनैतिक संबंधावरुन व तंटामुक्तीमधे झालेल्या बैठकीतील वादावरुन आरोपीवर खोटी केस दाखल केली. माझ्या मते, अभियोग पक्षाच्या संपुर्ण पुराव्याचे अवलोकनकरिता घटना सिद्धतेच्या अनुषंगाने केवळ दोन साक्षीदार तपासले. जरी फिर्यादी गणेश हिरामन रंगारी (सा.क्र.१) त्याच्या साक्षीमधे असे कथन करीत असला की, आरोपीने त्याला दगडाने मारहाण केली, परंतु, ही बाब दुसरा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अमीत विश्वपाल खोब्रागडे (सा.क्र.२) कथन करीत नाही. अभियोग पक्षाच्या पुराव्यामधे दगड जप्ती पंचनामा हा तयार करताना तपास अधिकाऱ्यांनी बऱ्याच तृटी केल्यामुळे व पंच साक्षीदारांनी सहकार्य न केल्यामुळे जो दगड जप्त करण्यात आला त्याच दगडाने मारहाण झाली आहे याबाबत संशय निर्माण होतो. तसेच, आरोपीने घेतलेल्या बचावामुळे व त्या संदर्भात दिलेल्या साक्षीदारांमुळे फिर्यादीसोबत असलेला त्याचा वाद पुराव्यात समोर येतो. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी जरी असे कथन केले की, नि.क्र.२३ मधील इजा जप्त केलेल्या दगडाने होवू शकतात, परंतु, त्यांनी हे देखील मान्य केले की, त्या जखमा दगडावर पडल्यास किंवा ओबड ढोबड जागेवर पडल्यास होवू शकतात. त्यामुळे फिर्यादीला झालेली जखम ही जप्त केलेल्या दगडानेच झाली हे संशयापलीकडे जावून सिद्ध होत नाही. तसेच आरोपीने घेतलेल्या बचावावरुन अभियोग पक्षाचा खटला संशयापलीकडे जावून सिद्ध झाला असे म्हणता येणार नाही. त्यामुळे खटल्यामधे निर्माण झालेला संशयाचा फायदा आरोपीला देवून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देतो.

**मुद्दा क्रमांक २ बाबत** :–

**२२.** मुद्दा क्रमांक १ च्या नकारार्थी निष्कर्षानुसार अभियोग पक्ष आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यास अपयशी ठरला. म्हणून मी मुद्दा क्र.२ करिता पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आरोपी **कृष्णा गुलाब मेश्राम** याला भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१) अन्वये शिक्षेस पात्र गुन्हयातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७१(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीने पुर्वी दिलेले बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता ४८१ अंतर्गत प्रत्येकी रुपये १५०००/– (अक्षरी पंधरा हजार) चे वैयक्तिक व जामीन बंधपत्र द्यावे.

४. खटल्यात जप्त ओबड धोबड दगड मुल्यहिन असल्याने अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषित करण्यात आला.)

LAD SURAJ JANARDAN
Digitally signed by LAD SURAJ JANARDAN
Date: 2026.05.04 14:55:41 +0530

भिवापूर
दिनांक – ०४.०५.२०२६.

(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File of judgment/order are word to word as per original judgment/order.

Name of Stenographer : Ku. K. S. Kathane,
to C.J.J.D. & J.M.F.C., Bhiwapur.